ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# मध्ययुगीन चरित्रात्मक लेखनाच्या प्रेरणा व परंपरा



डॉ . बाळासाहेब गार्डी
पदव्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र
रा . ब . नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर .

'चरित्र ही एका व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाची किंवा त्यातील विशिष्ट कालखंडाची कहाणी असते .' असे वाङ्मयीन संज्ञाकोशात म्हटले आहे . आरंभकाळातील लेखन तेराव्या शतकात महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या नाथ, महानुभाव व वारकरी या संप्रदायांच्या आश्रयाने करण्यात आले. हया संप्रदायांचे तत्वज्ञान निर्माण करणे व त्याचा प्रसार करणे हे कार्य महत्वाचे ठरले. या काळातील लेखक, कवी त्या त्या संप्रदायाचे संत-महंत मानले गेले. श्रध्दाभावनेने हे लेखन भारले गेले. जनसामान्यांविषयी कारुण्यभाव असल्याने ते लोकाभिमुख बनले. धर्म, अध्यात्माला महत्व देवून भक्तीचा प्रसार करुन समाज अध्यात्मप्रवण बनविला.

प्रारंभकाळात नाथसंप्रदायात लेखनाची परंपरा असूनही चरित्रात्मक लेखन झाल्याचे आढळून येत नाही. गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ यांच्या चरित्रकथा मुखपरंपरेने समाजात रुढ झालेल्या दिसतात. 16 व्या 17 व्या शतकांत नवनाथांची चरित्रे लिहिण्यात आली. परंतु चरित्रात्मक लेखनाला नाथ संप्रदायाकडून फारशी प्रेरणा मिळू शकलेली दिसत नाही.

महानुभाव व वारकरी संप्रदायात मात्र चरित्रलेखनाला प्रबळ प्रेरणा मिळाली. गद्य व पद्य अशा दोन्ही माध्यमातून चरित्रलेखन झाले. 13 व्या शतकातील मराठी वाडमय निर्मितीचे कार्य प्रामुख्याने महानुभाव व वारकरी संप्रदायातील लेखक कवींनी केलेले आहे. दोन्ही पंथाच्या प्रवर्तकांनी महाराष्ट्रातील सामाजिक व धर्मिक परिस्थितीचा अचूक अंदाज घेतला. दोन्ही पंथाची कार्यपध्दती व तत्वज्ञान चरित्रलेखनाला प्रेरक ठरली. हे दोन्ही संप्रदाय लोकसंग्रहक वृत्तीने महाराष्ट्राच्या समाजजीवनाशी एकरुप झाले. या दोन्हींचे तत्वज्ञान भक्तितत्वावर आधारलेले होते. या संप्रदायातील संतमहंतांचे वैयक्तिक चारित्र्य उच्च प्रतीचे होते. त्यांचा समाजातील सर्व स्तरामध्ये वावर होता. त्यांचे विचार व आचार यामध्ये एक विलक्षण सुसंगती होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाभोवती एक दिव्यतेचे वलय होते. साहजिकच त्यांच्या चरित्रा विषयी जनसामान्यांमध्ये एक प्रकारचे कुतूहल होते.

वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान भक्तिमार्गी होते. स्वतःचे व्यवसाय सांभाळून लोक साधना करु शकत. सदाचार, अंतःकरणाची शुध्दता, नामस्मरण, भजन, कीर्तन अशा साधनांचा ज्ञानेश्वरांनी उपदेश केला. देशभाषेचे माध्यम वापरुन संतांनी सामान्यांना उपदेश केला. प्रत्येक साधक स्वतःच्या अनुभवाचे बोल अभंग, ओवी, या सारख्या अक्षरछंदातून लिहून काढी. तत्वज्ञान आणि जीवन यांची सांगड घालता आल्यामुळे तत्वज्ञानातील कूट प्रश्नांचा शोध घेण्यासाठी चरित्रात्मक लेखन करण्यात आले. व्यक्तीला किंवा तिच्या तत्वज्ञानाला जाणून घेण्यासाठी चरित्रात्मक लेखनाला प्रेरणा मिळाली. या दोन्ही संप्रदायातील चरित्र निर्मितीमागे एक प्रकारची अपरिहार्यता जाणवते. चक्रधरांचा विरह ही लीळाचरित्राची प्रेरणा ठरते व ज्ञानेश्वरांची समाधी ही नामदेवांना त्यांचे चरित्र लिहिण्याला स्फूर्ती देते. प्राचीन मराठीतील या चरित्रग्रंथाची निर्मिती, त्यांचे स्वरुप, यामध्ये अशा प्रकारची पुष्कळशी साम्ये आढळतात.

चरित्रात्मक लेखनाच्या निर्मितीला भक्तीमार्गातील काही तत्वांचीही मदत झाली आहे. परमेश्वराच्या ठिकाणी मानण्यात आलेल्या गुणांचा अनुभव अंशमात्राने संत, विभूती, महंत यांच्यात येत असल्याने गुरु-शिष्य, संत-साधक, परमेश्वर आणि जीव हया नाते संबंधाचे भक्तिपंथात विशेष महत्व आहे. नामस्मरण, वंदन, अर्चन, कीर्तन, मनन, ध्यान, आत्मनिवेदन इ. भक्तीची नवविधसाधने चरित्रात्मक

लेखनाच्या बाबतीत उपकारक ठरली. चक्रधर स्वामी व ज्ञानेश्वरादी संताना परमेश्वराचे अवतारित्व देण्यात आले आहे. भक्तीमध्ये यामुळेच व्यक्तिनिष्ठेला महत्व येते.

भक्ती ही परमेश्वराचे स्वरुप जाणून घेण्याची एक वैशिष्टयपूर्ण वृत्ती आहे. भक्तीचा विषय झालेली व्यक्ती अथवा देवता सर्वार्थाने जाणून घेण्यासाठी तिच्याशी तन्मय पावणे, तिचा ध्यास घेणे, तिचे दर्शन घेणे व यांचेच सतत स्मरण करणे असे या वृत्तीचे स्वरुप आहे. या वृत्तीची साधना वारकरी व महानुभाव या भक्तिपंथामध्ये महत्वाची मानली गेली आहे. या वृत्तीतून प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखन करण्यात आले आहे.

## मध्ययुगीन चरित्रलेखनाची परंपरा :

### 1. लीळाचरित्र :

मराठीतील आद्यचरित्र माणल्या गेलेल्या लीळाचरित्राची निर्मिती महानुभाव संप्रदायातील पंडित माहीमभट्ट यांनी नागदेवाचार्यांच्या मदतीने केली. नागदेवांकडे चिंतनाच्या स्वरुपात उपलब्ध होऊ शकणारी चक्रधरस्वामींच्या जीवनाविषयीची सामग्री पाहून माहीमभट्टांना चरित्रलेखनाची प्रेरणा झाली. नागदेवांच्या आज्ञेनेच त्यांनी चक्रधरांच्या चरित्राची सामग्री संकलित करण्यास सुरुवात केली व मराठीतील आद्यचरित्रग्रंथ निर्माण केला. हे सारे परिश्रम त्यांनी केवळ श्रध्दाभावाने घेतले. गावोगाव, हिंडून, संन्यस्त वृत्तीने चक्रधर ज्या ज्या ठिकाणी वावरले. त्या त्या ठिकाणी जाऊन त्यांनी आठवणींची गाथा जमविली. लीळाचरित्राचे उदिष्ट पंथप्रवर्तकाचे चरित्र उपलब्ध करुन देणे व पंथाला एक तत्वज्ञानाची बैठक प्राप्त करुन देणे असे असले तरी त्यातून अनेक उद्दिष्टे सफल झालेली दिसून येतात. या चरित्रामुळेच अन्य व्यक्तींची चरित्रेही निर्माण झाली. भक्तांच्या मनात ती व्यक्तिरुपे स्थिरावली. त्यातूनच महानुभावांचे आध्यात्मिक वाङ्.मय निर्माण झाले. वाङ्.मयीन दृष्टीने स्मृतिरुप चरित्रात्मक लेखनाचा एक घाट सिध्द झाला.

संस्कृतमध्ये चरित्रकाव्याची जी परंपरा होती तिचे महानुभाव कवींनी अनुकरण केले. लीळाचरित्रातील काही प्रसंग निवडून चरित्रकाव्याची निर्मिती झाली. मूर्तिप्रकाश, ऋध्दिपूरवर्णन, सहयाद्रीवर्णन, तीर्थमालिका, रत्नमालास्तोत्र, प्रतिष्ठानवर्णन इ. ग्रंथ महानुभाव चरित्रात्मक काव्यामध्ये विचारात घेता येतील. नागदेवाचार्यांनी या लेखनाला उत्तेजन दिले. हे सारे कवी संस्कृत पंडित होते. त्यांनी चक्रधरांच्या चरित्राला महाकाव्याचा विषय बनविले. मात्र गद्य चरित्रलेखनाचे सामर्थ्य त्यांना महाकाव्यातून मांडता आले नाही. पद्य माध्यमातील या स्फूट रचनांची प्रेरणा पवित्र चरित्रकथांचे गायन करणे व आत्मोध्दार घडवून आणणे अशा स्वरुपाची दिसून येते.

### 2. चरित्रकार नामदेव :

नामदेवांनी संत ज्ञानेश्वरचरित्र आणि अन्य संतांची चरित्रे अभंगाच्या माध्यमातून लिहून एका नवीन परंपरेचा प्रारंभ केला. या चरित्रांचे स्वरुप, प्रेरणा महानुभाव चरित्र लेखनाहून वेगळया आहेत. वारकरी संप्रदायाचा मुख्य ग्रंथ ज्ञानेश्वरी हा होय. त्यात भक्तीच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केला आहे. या भक्तिप्रवण तत्वज्ञानाचा परिणाम त्यांच्या चरित्रलेखनावर वेगळया स्वरुपात झालेला दिसून येतो. नाथपंथी ज्ञानेश्वर, शिवभक्त विसोबा खेचर, दत्त संप्रदायी एकनाथ, चैतन्यपंथी तुकाराम हे सारे व्यापक भक्तीच्या तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून वारकरी संप्रदायासाठी लेखन करताना दिसतात.

वारकरी संप्रदायामध्ये कीर्तन परंपरेला विशेष महत्व दिले गेले. नामदेवांनी कीर्तनाला सामाजिक संस्थेची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. कीर्तनातून संतचरित्रे सांगण्याचा पायंडा पाडला. संतचरित्रातील कथांनी तत्वज्ञानाचे समर्थन करण्याची पध्दती रुढ केली. ज्ञानेश्वरांनी भक्तचरित्रे सांगणा-यांचा गौरव केला. नामदेवांच्या चरित्र लेखनाची प्रेरणा भक्ती हीच आहे. नामदेव हा वारकरी संप्रदायातील आद्य चरित्रकार होय. नामदेवांनी आत्मचिंतनाला महत्व देऊन लेखन केले. भक्तिभावनेने उत्कट अविष्कार चित्रित करणे ही एक प्रेरणा दिसते. नामदेव ज्ञानेश्वरांचे समकालीन असल्याने भावचिंतनावर भर देऊन चरित्रनलेखन करताना दिसतात.

महानुभाव चरित्रात्मक लेखनाने मराठीमध्ये चरित्रात्मक लेखनाची सुरुवात झाली. त्यांच्या तत्वज्ञानातील व्यक्तिनिष्ठतेमुळे व स्मरण भक्तीच्या सूत्रांमुळे लीळाचरित्रादी ग्रंथ लिहिले गेले. नामदेवांनी अभंगातून ज्ञानेश्वर चरित्र पद्य माध्यमातील चरित्रात्मक लेखनाचा प्रारंभ केला. महानुभाव कवींनी मराठीत संस्कृताच्या धर्तीवर चरित्रकाव्ये लिहिली . दोन्ही पंथातील लेखनातून नव्याने चरित्रलेखन केले जात असूनही चरित्रात्मक लेखनाचे उद्दिष्ट सफल झाले. मराठी चरित्रात्मक लेखनाच्या महत्वपूर्ण जाणीवा बीज रुपाने या काळात दिसून येतात. महानुभाव चरित्रलेखन अल्पजीवी ठरले. कारण पंचकृष्ण व आचार्य यांच्या पुरतीच चरित्रे लिहिली गेली. पण चरित्रात्मक लेखनाचे सामर्थ्य प्रकटून गेली. नामदेवांनी सुरु केलेली अभंगात्मक चरित्राची निर्मिती अठराव्या शतकाच्या अखेरी पर्यंत होत राहिली. चरित्र विषयाच्या निवडी बाबत सिध्द व साधक हा भेदभाव त्यांनी केला नाही.

### 3. मध्ययुगीन चरित्रात्मक लेखनाचा दुसरा कालखंड (1351 ते 1680) :

14 व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय व धार्मिक जीवन पूर्णपणे अस्थिर बनले. यादवी राजवट संपूष्टात आली. मुस्लिमांचे राज्य स्थापन झाले. हिंदूंच्या आचारविचारांवर, भाषेवर, वेशभूषेवर परकीय संस्कृतीचे विलक्षण परिणाम झाले. अशातच महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडून बहुसंख्यांकांचे जीवन जगणे अशक्य झाले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात एक ओसाडपणा निर्माण झाला. नामदेवांनंतर माहाराष्ट्रात जवळ जवळ दोनशे वर्षे नाव घेण्याजोगी प्रभावी व्यक्ती निर्माण झालेली दिसत नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर यांच्या वास्तव्यांने धर्मविचाराने निर्माण झालेले चैतन्याचे वारे विरुन गेले. लोक देशोधडीला लागले. ब्राम्हण व अन्य जातीतील समाज मुस्लिमांच्या पदरी उपजीविकेसाठी राबू लागला. उर्दू- फारसीचा मराठीवर परिणाम घडून आला. लौकिक व्यवहारातील बोली भाषेवर जेत्यांच्या भाषेचा प्रभाव दिसू लागला.

वरील एकंदर सामाजिक परिस्थितीचा परिणाम मराठी चरित्रात्मक लेखनावर अपरिहार्यपणे झालेला दिसून येतो. महानुभावांनी जोपासलेली, वाढवविलेली चरित्रात्मक लेखनाची पध्दती गुप्त सांकेतिक लिप्यांच्या स्वरुपात बंदिस्त होऊन गेली. गदय चरित्रात्मक लेखनाची एक समर्थ अशी परंपरा अल्पजीवी ठरली. तिचा व्हावा तसा विकास घडून येऊ शकला नाही. नामदेवांचे चरित्रग्रंथ व अभंगात्मक व ओवीबध्द चरित्रलेखनाची पदय माध्यमातील पध्दती कीर्तनाच्या आश्रयाने चालत राहिली. एकनाथ, सरस्वती गंगाधर, राघवदास, दासोपंत, मुक्तेश्वर, केशरस्वामी आदींनी ही परंपरा चालू ठेवली. एक प्रकारच्या अगतिकतेमुळे पुन्हा पौराणिक व्यक्तींच्या चरित्रकथा व रामायण-महाभारतातील कथांचे मराठी अनुवाद इ.कडे कवींनी आपले लक्ष केंद्रित केले.

महानुभाव, नाथ, दत्त इ. संप्रदाय कसेबसे अस्तित्व टिकवून राहिले. वारकरी संप्रदायाची स्थिती काहीशी बरी होती. कीर्तन, भजन, वा-या इ. ची पकड समाजमनावर टिकून होती. एकनाथांनी प्रपंच व परमार्थ हयांची सांगड घातली. आध्यात्मिक क्षेत्रात का होईना, पण समत्वबुध्दीने वागण्याचा आदर्श स्वतःच्या चारित्र्यातून निर्माण केला. एकनाथांनी पौराणिक चरित्रकाव्याच्या धर्तीवर भावार्थ रामायण, एकनाथी भागवतासारखे ग्रंथ लिहिले. केशवस्वामींनी एकनाथ चरित्र लिहिले. स्वरस्वती गंगाधरांनी गुरुचरित्र लिहिले. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी ख्रिस्तपुराण, सांतु आंतोनीही जीवित्वकथा या सारखे चरित्रात्मक लेखन केले. मध्य काळात मर्यादित स्वरुपाचे चरित्रात्मक लेखन झाले. परंतु प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनाचा प्रारंभकाळ व विकासाचा काळ जोडणारा हा दुवा असल्याने त्या काळातील लेखनाचा विचार करणे अगत्याचे ठरते.

### 4. संत एकनाथ :

एकनाथांनी आख्यान पध्दतीने चरित्रात्मक लेखन केले. एकनाथ मुख्यतः कीर्तनकार व प्रवचनकार होते. हयांसाठी चरित्रात्मक आख्याने लिहिली गेली. मध्यकाळातील चरित्रलेखकांनी याच दृष्टिकोनातून चरित्रलेखन केल्याचे आढळते.

*सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णवी। सज्जन वृंदे मनोभावे आधी वंदावी*
*संत संगे अंतरंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासनिध्द सुखे डोलावे*

*(एकनाथ गाथा 1675..)*

वरील अभंगातून एकनाथांची चरित्रकथा सांगण्याची प्रेरणा लक्षात येते. एकनाथांच्या मनासमोर भागवतातील भक्तचरित्रांचे आदर्श असल्याचे दिसून येते. संत आणि परमेश्वर यातील एकभाव हा एकनाथांच्या संतचरित्रातून प्रतीत होतो. एकनाथांनी पौराणिक भक्तश्रेष्ठांच्या चरित्रकथा लिहिल्या आहेत. संतचरित्रांमध्ये निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, स्तुतिप्रकरणे तर नामदेव, गोरा कुंभार, सावतामाळी, चोखामेळा, दामाजी यांची स्फुट चरित्रे लिहिली आहेत. उद्बोधन हे चरित्रलेखनाचे उद्दिष्ट बनल्यामुळे जीवनदर्शनापेक्षा तत्वज्ञानाचा पुरस्कार करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वीच्या चरित्रकथातून ज्ञात असलेल्या सामग्रीचाच उपयोग करताना दिसतात. वारकरी संप्रदायाची ही मर्यादा म्हणता येईल. वारकरी संप्रदायातील चरित्रलेखक संतांच्या प्रापंचिक सुखदुःखा विषयी फारसे लिहित नाहीत. त्यांच्या पारमार्थिक अलौकिक जीवनाविषयीच जास्त लिहिताना दिसतात. तसेच आपले चरित्रलेखनाचे श्रेय परमेश्वराला अर्पण करतात. परमेश्वराची सेवा याच बुध्दीने ते चरित्रकथा लिहित असतात.

### 5 . गुरूचरित्र :

मध्यकाळातील एक महत्वपूर्ण चरित्रग्रंथ म्हणजे गुरुचरित्र होय. गुरुच्या आज्ञेने व प्रेरणेने सरस्वती गंगाधर यांनी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाला सांप्रदायिक महत्व असल्याने चरित्रलेखन विस्तारशः लिहिलेले आहे. नृसिंह सरस्वती यांना श्रीदत्तात्रयाचा अवतार मानून चरित्रलेखन झाले आहे. पद्य माध्यमातील चरित्रात्मक लेखनाची परंपरा गुरुचरित्राने वाढविली. ओवीबध्द स्वरुपात असलेल्या गुरुचरित्राने संवाद पध्दतीने चरित्रकथन करण्याची पध्दती गुरुचरित्राने रुढ केली. व्यक्तिचित्रांच्या अनुषंगाने सामाजिक व धार्मिक संस्थांना गुरुचरित्राने आधार दिला. मात्र गुरुमाहात्म्य जनमाणसावर बिंबविण्याच्या भरामध्ये नृसिंह सरस्वतींच्या वास्तव जीवनमूर्तीपेक्षा अद्‌भूत

दृष्टांतांना व आश्चर्यकारक कथानाच महत्व दिले गेले आहे. अनेक मर्यादा लक्षात घेऊनही पंधराव्या शतकातील हा एकमेव नाव घेण्याजोगा चरित्रग्रंथ आहे हे विसरता येत नाही.

### 6. ख्रिस्ती मिशन-यांनी लिहिलेले मराठी चरित्रात्मक ग्रंथ :

15 व्या शतकात ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी गोमंतकामध्ये धर्मप्रसाराचे कार्य निरनिराळया मार्गांनी चालू केले. पोर्तुगीज राजसत्ता या धर्मप्रसाराला अनुकूल असल्याने धर्मान्तर मोठया प्रमाणात सुरु झाले. हजारो लोक विविध कारणांमुळे ख्रिस्ती धर्मात ओढले गेले. घरात मात्र हिंदू पध्दतीनेच चालत. ख्रिस्ती धर्माचे त्यांना ज्ञान मिळत नव्हते. हे ज्ञान देशीभाषेत देण्याची गरज निर्माण झाली. इ.स. 1585 च्या सुमारास फादर स्टिफन्स याने 'दौत्रिन क्रिस्ता' हा ग्रंथ लिहिला. त्यातूनच ख्रिस्तपुराण या ग्रंथाची प्रेरणा पुढे आली. भाषा व माध्यम या दोहोंच्या बाबतीत मराठी चरित्रात्मक लेखनाचे अनुकरण केलेले आढळते. ओवीचा सामान्यांवर असलेला प्रभाव पाहून स्टिफन्सनेही ओवीचा वापर केला आहे. स्टिफन्सची ही कामगिरी कौतुकास्पद आहे. हे अनुकरण इतके सरस आहे की मराठी कवींची सर्व वैशिष्टे तो सहजतेने अनुसरतो. मराठी भाषेचा गौरव करणा-या ओव्या तर सुप्रसिध्दच आहेत,

*जैसी हरळामाजी रत्नकिळा । कि रत्नामाजि हिरा निळा*
*तैसी भासामाजि चोखळा । भासा मराठी*

ख्रिस्तपुराणाचे अनुकरण करुन सालंदाज याने 'सांतु अंतोनीची जिवित कथा' हा चरित्रग्रंथ लिहिला. सांतु आंतोनी या संताने केलेल्या चमत्काराच्या कथा यात गुंफलेल्या आहे. या ग्रंथाच्या प्रेरणाही वरील प्रमाणेच दिसून येतात. या चरित्र कथा बाटलेल्या हिंदूच्या मनाला रुचतील, भक्तिभावनेला आकळतील अशाच स्वरुपाच्या आहेत. धर्मप्रसाराच्या गरजेतून जरी हे चरित्रलेखन निर्माण झाले असले तरी मराठी चरित्र लेखनाचे सर्व संकेत ते पाळतात. त्यासाठी मिशनरी वृत्ती व श्रम करण्याची कुवत विलक्षण म्हणावी लागेल.

मध्यकाळातील एकूणच परिस्थिती पाहता असे दिसून येते की, अस्थिरतेमुळे चरित्रविषयक जाणिवांचा तितका विकास घडू शकला नाही. सामग्रीच्या, संकलनाच्या प्रक्रिया स्थूल मानाने घडून आल्या, व्यक्तिमत्वातील बारकाव्यांचे अवलोकन व नोंद होऊ शकली नाही. चमत्कारावर व्यक्तीचे मोठेपण मोजले जाऊ लागले. संप्रदायाच्या तत्वज्ञानाला महत्व आले. एखाद-दुसऱ्या प्रसंगकथेचा आधार घेऊन स्फुट चरित्रे लिहिली गेली. पौराणिक व वास्तवाचे मिश्रण झाल्यामुळे सत्याची चिकित्सा कमी झाली. महानुभाव गद्य चरित्राची परंपरा गुप्त लिप्यात बंदिस्त झाली. तिची जागा घेणारे गद्य चरित्रात्मक लेखन मध्यकाळात घडले नाही.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात गद्य आणि पद्य हया दोन्ही माध्यमातील चरित्रात्मक लेखनाला एक प्रकारची प्रौढता व विकसित रुप प्राप्त झालेले दिसते. अध्यात्मिक क्षेत्रापुरते मर्यादित असलेले वाङ्.मय राजकीय क्षेत्रातील व्यक्तींविषयी कुतूहल दाखवू लागले.शहाजी, शिवाजी सारख्या पराक्रमी वीर पुरुषांनी सर्वच क्षेत्रात मोठा विकास घडवून आणला. या काळात बखर, पोवाडे इ. च्या स्वरुपात चरित्रलेखन होऊ लागले. पराक्रमाच्या कथा गायिल्या जाऊ लागल्या. याच काळात केशवस्वामी, श्रीधर, भीमस्वामी, उध्दवचिद्घन, हनुमंतस्वामी, गिरिधरस्वामी, राजाराम प्रासादी, महिपती यांनी मराठी चरित्रात्मक लेखनाला नेटके व साक्षेपी स्वरुप प्राप्त करुन दिले. यवनांच्या राजदरबारात लेखनिक म्हणून काम करणा-या लोकांनी फारसी, उर्दू भाषेवर प्रभुत्व मिळवले. फारसी भाषेतील तवारिखा, नामे कैफियती, हकीकती यासारखे लेखनप्रकार हाताळण्यास सुरुवात केलेली दिसते. उर्दू-फारसीच्या परिचयातून बखरकाराची एक स्वतंत्र लेखन पध्दती सिध्द झालेली दिसते. अभंग, ओवी या माध्यमातून चरित्रलेखन करणा-यांनी उत्तर हिंदुस्थानातील चरित्रग्रंथ या निमित्ताने वाचलेले दिसतात. व त्या धर्तीवर त्यांनी मालाचरित्रांची मराठीत निर्मिती केली. महिपतीसारखा चरित्रकार नाभाजी सारख्या चरित्रकाराचे ऋण मान्य करतो. रामदासी शिष्यांनी पदे, डफगाणी, कडाका या काव्यप्रकारातून संतचरित्रांचे लेखन केल्याचे दिसून येते. रामदास स्वामींच्या जीवनावर त्यांच्या शिष्यांनी पुष्कळसे चरित्रात्मक लेखन केलेले दिसून येते.

### संदर्भ व टीपा :

1. देवळे शं. रा., 'भक्तविजय', आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे. 2004, पृ. 588
2. कुंदूर रमेश, 'संतलीलामृत', आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे. 2006, पृ. 409
3. तत्रैव, पृ. 11
4. ढेरे रा. चि., 'संतांच्या चरित्रकथा',पुष्पक प्रकाशन,1967 पृ. 67
5. फडके वि. के., 'भक्तलीलामृत', यशवंत प्रकाशन, 1988, पृ. 481
6. 'विविधज्ञानविस्तार', ऑक्टोंबर 1909, पृ. 373-382
7. ढेरे रा. चि., 'संतांच्या चरित्रकथा',पुष्पक प्रकाशन,1967 पृ. 69